Gurukul

# गुरुकुल विद्यालय अ.लाट

ता. शिरोळ जि. कोल्हापूर

गुरुकुल विद्यालय अ.लाट या प्रशालेने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ (२०१४ चा महा.७) यांच्या कलम ४ (२) च आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ च्या नियम ४(२) मधील तरतुदीनुसार इ. ६ वी ते १० वी या वर्गांच्या पालक शिक्षक संघाची बैठक रविवार दि. ११/०७/२०२१ रोजी दुपारी १२:०० वाजता ZOOM APP व्दारे ONLINE आयोजित केले आहे. सदर बैठकीमध्ये खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. रेवती सचिन मगदूम यांच्या अध्यक्षते खाली बैठक बोलाविण्यात आली होती, सोबतच्या यादी प्रमाणे बैठकीस सदस्य हजर होते.

विषय : १) मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव : ११/०७/२०२१ १) मागील सभा शुक्रवार दि. २६/०६/२०२० रोजी दु. ०४:०० वाजता आयोजित करण्यात आली होती त्याचा वृत्तांत शिक्षक पालक सभेच्या सचिव सौ. रुपाली देशभूषण कागे यांनी सभेमध्ये वचून दाखवले. सभेने त्यास कायम करण्यास सर्वानुमते मंजूर केले.

सूचक : श्री. संजय अण्णासो पाटील

अनुमोदक : श्री. राजेंद्र शंकर पाटील

विषय क्रमांक : २) चालू शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमाबाबत विचार विनियम करणे.

ठराव क्रमांक : ११/०७/२०२१ २) चालू शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमाबाबतचे नियोजन व त्याची अंमलबजावणी या बाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने नेमून दिलेला अभ्यासक्रम राबविण्याचे ठरले. त्याच्या अंमलबजावणी बाबतचा निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार मुख्याध्यापिका सौ. रेवती सचिन मगदूम यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.

सूचक : श्री. सुकुमार बापुसो शेडबाळे

अनुमोदक : सौ. उषा जयसिंग खैरे



MNDP's
GURUKUL VIDYALAY, A. LAT.
Ganesh Mahadev Naykude, Founder Chairman
Off. : Gurukul Campus, Abdul Lat - 416 143, Tal. Shirol, Dist. Kolhapur, (Maharashtra) INDIA
Ph. 02322 254888, 254666, Cell : 7038625666
E-mail: admin@gurukulschools.org, Website : www.gurukulschools.org

विषय क्रमांक : ३) शैक्षणीक दृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांसाठी उपाय योजना करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे बाबत.

ठराव क्रमाक : ३) शैक्षणीक दृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न गरजेचे असल्याचे मुख्याध्यापिका
११/०७/२०२१ यांनी सभेमध्ये सांगितले. त्याबाबत विविध उपायाबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. व योग्य ते उपाय योजना करण्याचा अधिकार मुख्याध्यापिका सौ. रेवती सचिन मगदूम यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.

सूचक : सौ. मनीषा रविकांत पाटील

अनुमोदक : सौ. पूनम संतोष गायकवाड

विषय क्रमांक : ४) अभ्यासा अंतर्गत इतर उपक्रमांचे नियोजन करणे व तपासणे या बाबतचा अधिकार व सह्याचे अधिकार देणे.

ठराव क्रमांक : ४) अभ्यासा अंतर्गत इतर उपक्रमांचे नियोजन करणे व वेळोवेळी तपासणी करणे गरजेचे
११/०७/२०२१ असल्याचे सभे मध्ये मांडण्यात आले. वरील विषयावर चर्चा होऊन याबाबतचा अधिकार तसेच या अनुशंघाने येणाऱ्या विविध शासकीय निमशासकीय कागदपत्रावर सह्यांचा अधिकार मुख्याध्यापिका सौ. रेवती सचिन मगदूम यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.

सूचक : सौ. सुनिता नयनु पाटील

अनुमोदक : श्री. आप्पासो भास्कर नंदिकुरळे

विषय क्रमांक : ५) कार्यकारी समिती नेमणुकी बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्रमांक : ५) महाराष्ट्र शिक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम, २०११ मधील नियम ६ मधील
११/०७/२०२१ कार्यकारी समितीची स्थापना करणेचे असले बाबत श्री. तेजस अण्णासो पाटील यांनी सुचविले. यावर सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन कार्यकारी समिती स्थापना करणे बाबत योग्य त्या प्रक्रिया पूर्ण करण्याचा अधिकार शिक्षक पालक संघाच्या अध्यक्षा सौ. रेवती सचिन मगदूम यांना देण्याचे सर्वानुमते ठरले

सूचक : श्री. तेजस अण्णासो पाटील

अनुमोदक : सौ. ज्योती अरविंद गायकवाड



MNDP's
GURUKUL VIDYALAY, A. LAT.
Ganesh Mahadev Naykude, Founder Chairman
Off. : Gurukul Campus, Abdul Lat - 416 143, Tal. Shirol, Dist. Kolhapur, (Maharashtra) INDIA
Ph. 02322 254888, 254666, Cell : 7038625666
E-mail: admin@gurukulschools.org, Website : www.gurukulschools.org

CS Scanned with CamScanner

Gurukul™

विषय क्रमांक : ६) कोविड १९ मुळे भविष्यात शाळा प्रत्यक्षात सुरु करताना शाळा व्यवस्थापन समीतीने योग्य ती नियमावली बनविण्याबाबत विचार विनिमय करणे

ठराव क्रमांक : ६) कोविड १९ मुळे भविष्यात शाळा प्रत्यक्षात सुरु करताना शासनाच्या निर्देशानुसार योग्य ती
११/०७/२०२१ खबरदारी घेवून चालू करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले

सूचक : सौ. उमा संतोष कोळी

अनुमोदक : श्री. क्रिष्णात गणपतराव निकम

विषय क्रमांक : ७) चालू शैक्षणिक वर्षाच्या क्लास फी / टर्म फी व इतर फी विषयी चर्चा करून निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक : ७) चालू शैक्षणिक वर्षाच्या क्लास फी / टर्म फी व इतर फी याबाबत कोणताही बदल न
११/०७/२०२१ करता मागील शैक्षणिक वर्षाप्रमाणे फी ठेवण्यात यावी असे ठरले. कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर व्यवस्थापन खर्चाची बचत होत असल्याच्या कारणाने संपूर्ण फी एकरकमी भरणाऱ्या विद्यार्थ्यांना ५०० रु. सुट देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**सन २०२१-२२ मधील शैक्षणिक फी**

| Class | Last year fee | Concession fee | One instalment | Two instalment | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Before -24 July | Before -24 July | Before -14 Oct |
| 6th class | 8500 | 500 | 8000 | 4500 | 4500 |
| 7th to 9th class | 9000 | 500 | 8500 | 4750 | 4750 |
| 10th | 10000 | 500 | 9500 | 5250 | 5250 |

सूचक : श्री. सचिन बाळासो बेळगावे

अनुमोदक : श्री. सुनील जयकुमार गिरमल



MNDP's
GURUKUL VIDYALAY, A. LAT.
Ganesh Mahadev Naykude, Founder Chairman
Off. : Gurukul Campus, Abdul Lat - 416 143, Tal. Shirol, Dist. Kolhapur, (Maharashtra) INDIA
Ph. 02322 254888, 254666, Cell : 7038625666
E-mail: admin@gurukulschools.org, Website : www.gurukulschools.org

Gurukul™

विषय क्रमांक : ८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

ठराव क्रमांक : ८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी कोणतेही विषय न आल्याने सदर सभा ठीक दुपारी ०१:०० वाजता संपली

| | |
|---|---|
| सही | सही |
| सचिव | अध्यक्ष |
| पालक शिक्षक संघ | पालक शिक्षक संघ |



MNDP's
GURUKUL VIDYALAY, A. LAT.
Ganesh Mahadev Naykude, Founder Chairman
Off. : Gurukul Campus, Abdul Lat - 416 143, Tal. Shirol, Dist. Kolhapur, (Maharashtra) INDIA
Ph. 02322 254888, 254666, Cell : 7038625666
E-mail: admin@gurukulschools.org, Website : www.gurukulschools.org